# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.६४ दिनांक ०५/०७/२०२१

### डहाणु पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.। १५८/२०२१ भादवी ३०२ प्रमाणे

दिनांक ०४/०७/२०२१ रोजी रात्रौ २२.०० वाजेच्या सुमारास किरकोळ कारणावरुन झालेल्या भांडणाचा मनात राग धरुन आरोपीत याने दिनांक.०५/०७/२०२१ रोजी रात्रौ ००.०५ वाजेच्या सुमारास आगर वावरपाडा येथील फिर्यादी याचे घरासमोरील मयत हर्षला राजेश करबट हिच्या घराच्या पाठीमागील दरवाज्यातुन आत येवुन मयत हिस पोटात व छातीवर चाकुने भोसकुन गंभीर जखमी करुन जिवे ठार मारले म्हणुन डहाणु पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.१५८/२०२१ भादवी ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यास सपोनि/अमोल गवळी, प्रभारी अधिकारी डहाणु पोलीस ठाणे व पोलीस अंमलदार यांनी तात्काळ अटक केली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/अमोल गवळी, प्रभारी अधिकारी डहाणु पोलीस ठाणे, हे करित असुन आरोपीत यास दि.०९/०७/२०२१ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे.

Scanned with CamScanner